महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, यांचे कार्यालय, प्लॉट नं.८१४–सी/९१–सी, सरपोचखानवाला रोड, वरळी, महाराष्ट्र राज्य, मुंबई – ४०० ०३०.

क्रमांक : एसीबी/आ–२/जाहिरात/२०११/६८८०                    मुंबई, दि. २०/०८/२०११

महाराष्ट्र शासन गृह विभाग, निर्णय क्रमांक एपीओ/प्र.क्र.२२७/पोल–३, दिनांक २१–०८–२००६ व क्रमांक एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/पोल–१०, दिनांक १५–९–२००६ व समक्रमांक दिनांक २६–६–२००७ अन्वये महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आस्थापनेवर रिक्त होणाऱ्या विधी सल्लागार यांचे १ पद कंत्राटी पध्दतीने ११ महिन्यांकरिता भरावयाचे आहे.

सदर पदाकरिता नमूद शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी पात्र व इच्छूक उमेदवारांनी सोबतच्या नमुन्यात आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित झेरॉक्स प्रतिसह अर्ज, महासंचालक, अॅन्टी करप्शन ब्युरो, प्लॉट नं.८१४–सी/९१–सी, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – ४०० ०३० यांचे नांवे दिनांक ५–९–२०११ रोजी संध्याकाळी ५.०० वा.पर्यंत पोहचतील या बेताने पाठवावेत. तद्नंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही.

सदरचे पद ११ महिन्यांचे कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार असून एकत्रित मासिक वेतन रू.२५,०००/– + दुरध्वनी व प्रवास खर्च रू.३०००/– देय राहिल. या व्यतिरिक्त निवड झालेल्या उमेदवारांना इतर कोणतेही शासकीय वेतन व भत्ते आदा करण्यात येणार नाही.

सदर पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव व इतर अटी व शर्ती लागू राहतील.

**अ) शैक्षणिक अर्हता** : उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाचा विधी पदवीधर व बार परिषदेचा सनदधारक असणे आवश्यक आहे.

**ब) वय** : उमेदवाराचे वय ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

**क) अनुभव** : उमेदवारास वकिली व्यवसायातील किमान ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**ड) कर्तव्य व जबाबदाऱ्या : –**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे. व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. सेवाविषयक/प्रशासकीय बाबी/विभागीय चौकशी तथा समकालिन कायद्यांची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

...........२/

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.
४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.
५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करून तद्नुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.
६. अपिल करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपिलाचा मसुदा तयार करून तो संबंधित सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.
७. विधी विषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेली कार्य विहित मुदतीत पार पाडणे.
८. प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

अटी व शर्ती –

१. सदर पदाची नेमणूक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी/अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

२. सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येईल. ११महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापी, अशी मुदत वाढविताना एकावेळी ही मुदत ११ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही याची काळजी नियुक्ती प्राधिकारी घेईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त ३ वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

३. निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम/व्यवसाय नियुक्ती प्राधिकाराच्या लेखी पुर्व परवानगीशिवाय करू शकणार नाही. जर नियुक्ती प्राधिकाऱ्याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरू ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

.......३/

४. उमेवाराची निवड मुलाखतीव्दारे करण्यात येईल. मुलाखतीचा दिनांक अर्जात दिलेल्या पत्त्यावर/दुरध्वनीवर/मोबाईलवर कळविण्यात येईल.

५. उमेदवाराला कोणताही मुलाखतीसाठी प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

६. नियुक्ती केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा रू.१००/— शुल्काच्या मुद्रांकावर करारनामा करणे अनिवार्य आहे.

७. उमेदवाराने वर विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दिनांक ५/९/२०११ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे.

८. अर्जासोबत २.५ सें.मी. X २.५ सें.मी. आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

९. वरील सर्व नमूद अटी अर्हता व अनुभव असणारे तसेच आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणारे उमेदवार सदर पदाचे मुलाखतीसाठी पात्र राहतील.

१०. वरील पदाच्या भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

११. वरील पदाच्या भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची शिफारशी, वशिलेबाजी राजकीय दबाव अशा गैरप्रकारचा अवलंब केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

( एस.बी. सुर्यवंशी)
अपर पोलीस अधिक्षक (मुख्यालय),
महासंचालक, अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,
म.राज्य, मुंबई यांचेकरिता.

एका फोटोवर स्वाक्षरी करून या जागी चिकटवावा व दुसरा फोटो स्वाक्षरी करून अर्जासोबत जोडावा

# अर्जाचा नमुना

विधी सल्लागार पदाकरिता अर्ज

कार्यालयीन उपयोगासाठी

१. अर्ज क्र. [ ][ ][ ][ ]

२. अर्ज स्वीकारल्याचा दिनांक : [ ][ ] [ ][ ] [ ][ ][ ][ ]

३. अर्ज स्वीकारणाऱ्याची स्वाक्षरी (दिनांकासह) ..................................................................

---

सुचना : १. अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणी माहिती फक्त इंग्रजीत लिहावी. आवश्यक नसेल तेथे खोडावे.

२. अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.

## अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : आडनाव नांव वडिलांचे नांव/पतीचे नाव

मराठीत : ........................................................................................................................

इंग्रजीत : [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]

२. पत्र व्यवहाराचा पत्ता : .........................................................................................

तालुका : ............................ जिल्हा :................. पीन कोड [ ][ ][ ][ ][ ][ ]

३. कायमचा पत्ता : .........................................................................................

तालुका : ............................ जिल्हा :..................पीन कोड [ ][ ][ ][ ][ ][ ]

४. दूरध्वनी क्रमांक : लॅंडलाईन ...............ोबाईल क्रमांक ...........

५. जन्मदिनांक [ ][ ] [ ][ ] [ ][ ] : जन्म स्थळ : .......................

दिवस महिना वर्ष

६. दिनांक : ५.९.२०११ रोजीचे [ ][ ] [ ][ ] [ ][ ] वय

वर्ष महिने दिवस

७. लिंग : पुरूष [ ] /महिला [ ]

८. धर्म : ......... ............. ......... जात .......................................

९. महारा ट्र राज्याचे रहिवासी आहात काय ? होय ☐ नाही. ☐

## (ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

शैक्षणिक अर्हता :

| शिक्षण | शैक्षणिक संस्थचे नांव (विद्यालय/महाविद्यालय) | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १० वी) | | | | | |
| २. पदवी | | | | | |
| ३. विधी पदवी | | | | | |
| ४. विधी पदव्युत्तर | | | | | |

१२. इतर शैक्षणिक अर्हता : ..........................................................................................

इतर शैक्षणिक अर्हता : ..........................................................................................

संगणक प्रशिक्षीत आहात काय ? होय ☐ नाही ☐

१३. अर्जदाराची इतर माहिती :

अ) सनद घेतल्याचा दिनांक : ....................................................

ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशिल :

| अ. क्र. | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

टिप : वकिली व्यवसायाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१४. अ : अर्जदारावर यापूर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/बध्द करण्यात/दंड करण्यात/सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगाकडून त्यांच्या परिक्षांना/निवडींना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय, किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय, किंवा कोणत्याही विद्यापिठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणाकडून/संस्थेकडून/ कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय/ काढून टाकण्यात आले आहे काय ? होय /नाही

१४.ब : हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालयात, विद्यापीठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकरणात/संस्थेत उमेदाराविरूध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? होय / नाही

१४.क. लाचलुचपत प्रतिबंध बाबत विशेष अनुभव असल्यास त्याबाबत माहिती अगर प्रमाणपत्र.

( १४–अ किंवा १४–ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक, स्थानबध्दता, दंड, दोषसिध्दी, शिक्षा आदेश इत्यादींचा संपूर्ण तपशिल आणि न्यायालयीन/विद्यापीठ/शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरूप स्पष्ट करावे )

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, श्री./सौ/कु ..............................................................................................
....... याव्दारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरूध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकार अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

ठिकाण :

दिनांक :

सोबत : अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती.